राज्यातील नगरपरिषदांना वितरीत होणाऱ्या
महागाई भत्ता अनुदान आणि जकात
अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्याबाबत

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत
३रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ३०.
परिपत्रक क्र. नपप्रस/का.८/महागाई भत्ता/२००४-०५/५०७
दि. ५ जुलै २००४

वाचा - १) शासन निर्णय क्र. नगर विकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग क्र. एमयुएन १०७२/४३९९७/-ए. दि. ३०/१०/१९७३.
२) शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. डि.डि.ओ.१०००/प्र.क्र. १६१/कोषा-प्र-५, दि. १९/६/२००१.

## परिपत्रक

राज्यातील नगरपरिषदांना राज्य शासनाकडून विविध प्रकारची अनुदाने वितरीत करण्यात येतात. त्यामध्ये महागाई भत्ता अनुदान आणि जकात अनुदानाचा समावेश आहे. महागाई भत्ता अनुदान हे प्रतिपूर्ती स्वरूपाचे अनुदान असून नगरपरिषदांनी मंजूर पदांवर मंजूर वेतनश्रेणीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनामधील महागाई भत्त्यावर केलेला खर्च अनुदान स्वरूपात देण्यात येतो. जकात अनुदान हे जकात वसूली बंद केल्यानंतर नुकसानभरपाईपोटी देण्यात येत असलेले अनुदान आहे. वरील नमूद दोन्ही अनुदानांचा विनियोग नगरपरिषदांनी आस्थापनेवरील खर्चामधील कर्मचाऱ्यांचे वेतनाकरीता व निवृत्तीवेतनाकरिता प्राधान्याने करणे अपेक्षित आहे.

राज्य शासनाकडून नगरपरिषदांना देण्यात येणारी वरील अनुदाने ही जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वितरीत होत असून उपरोक्त अनुदानामधून जिल्हाधिकारी स्तरावर शासकिय देणी, शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर इ. रकमा समायोजित/कपात होत असल्याने वितरीत अनुदानानुसार नगरपरिषदांना प्रत्यक्ष रक्कम कमी प्राप्त होत असल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर दैनंदिन खर्च भागविणे अशक्य झालेले आहे. वरील बाब विचारात घेऊन यासंदर्भात अनुदानाचा विनियोग करण्याबाबत खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

अ. **जिल्हाधिकारी यांना निदेश देण्यात येत आहे की वरील दोन अनुदानांमधून त्यांनी कोणत्याही प्रकारच्या रकमा समायोजित अथवा कपात करू नयेत.**

ब. नगरपरिषदांना मंजूर करण्यात आलेले महागाई भत्ता अनुदान आणि जकात अनुदान या दोन्ही अनुदानांकरीता प्रत्येक नगरपरिषदेचे एक स्वतंत्र बँक खाते खालील सूचनेनुसार उघडून त्या खात्यामध्ये मंजूर करण्यात आलेली अनुदानाची रक्कम जमा करावी.

क. वरील संयुक्त खाते सर्वसाधारणपणे स्टेट बँक ऑफ इंडिया (अथवा कोषागारामार्फत ज्या बँकेमधून व्यवहार सध्या चालत आहेत अशी शासन निर्देशित शेड्यूल्ड बँक) मध्ये काढणे सोयीस्कर असल्याने व त्या बँकेची शाखा नगरपरिषद असलेल्या शहरामध्ये असेल तर तिथे बँक खाते उघडण्यात यावे.

ड. अनुदानाकरिता उघडण्यात आलेले खाते हे जिल्हाधिकारी (अथवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी) आणि संबंधित नगरपरिषदेचा मुख्याधिकारी या दोघांच्या स्वाक्षरीने चालविण्यात यावे. खात्यामधून काढण्यात येणाऱ्या रकमेकरीता दोघांची स्वाक्षरी अनिवार्य असल्याची तरतूद करण्यात यावी.

इ. जकात अनुदानाच्या जमा रकमेमधून मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. २२२२/२००१, ३५४५/२०००, ३०२१/१९९९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार व त्या अनुषंगाने या कार्यालयाने काढलेल्या परिपत्रक क्र. सेनिवे २००३/प्र.क्र.९६/०३/९ दि. २०/१२/२००३ मध्ये नमूद केल्यानुसार निवृत्तीवेतनधारकांना देय आणि शिल्लक असलेल्या थकबाकीची रक्कम जकात अनुदान रकमेच्या जास्तीत जास्त ५०% इतकी त्याकरीता वापरण्यात

यावी. जकात अनुदानाची उर्वरीत रक्कम व महागाई भत्ता अनुदानाची जमा झालेली रक्कम नगरपरिषद आस्थापनावरील नियमित कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनाकरीताच वापरण्यात यावी.

ई. शासनाकडून वितरीत झालेल्या अनुदानामधून नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी रक्कम कमी पडत असल्यास न.प. निधीमध्ये असलेली रक्कम अनुदानाच्या बँक खात्यामध्ये जमा करावी व कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत होईल याची दक्षता घ्यावी.

प. वरील खात्यामधील असल्याने व त्या बँकेची शाखा नगरपरिषद असलेल्या शहरामध्ये असेल तर तिथे बँक खाते उघडण्यात यावे.

ड. अनुदानाकरीता उघडण्यात आलेले खाते हे जिल्हाधिकारी (अथवा त्यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी) आणि संबंधित नगरपरिषेचा मुख्याधिकारी या दोघांच्या स्वाक्षरीने चालविण्यात यावे. खात्यामधून काढण्यात येणाऱ्या रकमेकरीता दोघांची स्वाक्षरी अनिवार्य असल्याची तरतूद करण्यात यावी.

इ. जकात अनुदानाच्या जमा रकमेमधून मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. २२२२/२००१, ३५४५/२०००, ३०२१/१९९९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार व त्या अनुषंगाने या कार्यालयाने काढलेल्या परिपत्रक क्र. सेनिवे २००३/प्र.क्र. ९६/०३/९ दि. २०/१२/२००३ मध्ये नमूद केल्यानुसार निवृत्तीवेतनधारकांना देय आणि शिल्लक असलेल्या थकबाकीची रक्कम जकात अनुदान रकमेच्या जास्तीत जास्त ५०% इतकी त्याकरीता वापरण्यात यावी. जकात अनुदानाची उर्वरीत रक्कम व महागाई भत्ता अनुदानाची जमा झालेली रक्कम नगरपरिषद आस्थापनावरील नियमित कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनाकरीताच वापरण्यात यावी.

ई. शासनाकडून वितरीत झालेल्या अनुदानामधून नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी रक्कम कमी पडत असल्यास न.प. निधीमध्ये असलेली रक्कम अनुदानाच्या बँक खात्यामध्ये जमा करावी व कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत होईल याची दक्षता घ्यावी.

प. वरील खात्यामधील रकमेचा विनियोग नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील नियमित कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीताच करण्यात यावा. नगरपरिषद आस्थापनेवरील रोजंदारी कर्मचारी अथवा अनियमित नेमणूका असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता या अनुदानाच वापर कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांनी घ्यावी. नगरपरिषद आस्थापनेवर असलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांचे वेतन नगरपरिषद निधीमधून अदा करावे.

फ. तसेच उपरोक्त बँकेमध्येच नगरपरिषद कर्मचाऱ्यांची वेतनाची बँक खाती उघडावीत व त्या खात्यामध्ये त्यांच्या वेतनाच्या रकमा इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर पद्धतीने जमा कराव्यात. त्यामुळे त्यांच्या वेतनास होणारा विलंब टाळता येईल.

भ. कर्मचाऱ्यांच्या वेतनामधून कपात करावयाच्या रकमा (उदा. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी अंशदान, गटविमा योजना, व्यवसाय कर, आयुर्विमा मंडळाचा हप्ता, सोसायटीची देणी इ.) उपरोक्त खात्यामधून परस्पर वळत्या करण्यात याव्यात.

म. वरील खर्चानंतर शिल्लक राहीलेल्या अनुदानामधून नगरपरिषदेतील नियमित कर्मचाऱ्यांच्या इतर थकबाक्या असल्यास (उदा. उपदानाची रक्कम, भविष्य निर्वाह निधीची रक्कम इ.) त्यासाठी शिल्लक रकमेचा उपयोग करावा.

त. त्यानंतर शिल्लक रकमेमधून वेतन राखीव निधीमध्ये नियमानुसार रक्कम जमा नसल्यास ती जमा करावी.

थ. वरीलप्रमाणे खर्च झाल्यानंतर जर अनुदान रक्कम शिल्लक असेल तर अकराव्या वित्त आयोगाच्या अनुदानाच्या खात्यामध्ये नगरपरिषदेचा हिस्सा जमा झालेला नसेल तर त्यासाठी शिल्लक रकमेचा उपयोग करावा.

द. वर नमूद केलेल्या खर्चानंतर रक्कम शिल्लक असल्यास ती रक्कम नगरपरिषद निधीमध्ये जमा करावी.

हे परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर वितरीत होणारे महागाई भत्ता अनुदान आणि जकात अनुदानाबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात यावी.

वरील सुचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी यांची असून त्यामध्ये दुर्लक्ष झाल्यास मुख्याधिकाऱ्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल. वरील कार्यवाही निदेशानुसार योग्य रित्या पार पाडणे कामी जिल्हास्तरावर नियंत्रण जिल्हाधिकारी यांनी ठेवावयाचे आहे.

(सुनील सोनी)
आयुक्त व संचालक
नगरपरिषद प्रशासन
महाराष्ट्र राज्य

प्रत :

१. मा. सचिव, नगर विकास विभाग